**प्रेस नोट** दिनांक २०/१२/२०२३

तहसिलदार कार्यालय, ठाणे येथील मंडळ अधिकारी व खाजगी इसमं यांना लाच स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी घेतले ताब्यात...

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक, कलम | ठाणे नगर पोलीस स्टेशन |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **१) महेंद्र गजानन पाटील, वय ५१ वर्षे, मंडळ अधिकारी, तहसिलदार कार्यालय, ठाणे**<br>**२) वाजीद महेबुब मलक, वय ६३ वर्षे, खाजगी इसम** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १०,००,०००/—रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,००,०००/—रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांचे रेमण्ड कंपनी, ठाणे येथे चालु असलेल्या साईटवर खोदकाम करण्याकरीता मिळालेल्या परमिशनपेक्षा जास्तीचे खोदकाम ते करीत असून त्याबाबतचा खोटा रिपोर्ट वरिष्ठ कार्यालयास सादर न करण्याकरीता वरील नमुद लोकसेवक महेंद्र गजानन पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे १०,००,०००/—रु. लाचेची मागणी केल्याबाबत दि. १८/१२/२०२३ रोजी तक्रार प्राप्त झाली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि १८/१२/२०२३ रोजी पडताळणी केली असता वरील नमुद आरोपी लोकसेवक महेंद्र गजानन पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती ६,००,०००/—रु. स्विकारण्याचे मान्य करून त्यापैकी पहिला हप्ता २,००,०००/—रु हा दि. २०/१२/२०२३ रोजी व दुसरा हप्ता ४,००,०००/—रु हा दि. २३/१२/२०२३ रोजी स्विकारण्याचे मान्य केल्यावरून अेसीबी, ठाणे युनिटने सापळयाचे आयोजन करून आरोपी लोकसेवक **महेंद्र गजानन पाटील** यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेचा पहीला हप्ता म्हणून २,००,०००/—रु. स्विकारून ती रक्कम आरोपी क्र. २ **वाजीद महेबुब मलक** यांचेकडे ठेवण्यास दिली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारीः— श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :— **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**

संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in

अॅप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री नं :— १०६४

दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९


पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे (शिक्का)

**( नितीन थोरात )**
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे.

Scanned with CamScanner